0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलीस स्टेशन, मुंबई यांचे दि. ०८/०९/२०११ रोजीचे पत्र व त्यासोबत प्राप्त झालेले कागदपत्र.

२) ॲड. श्रीकांत सी. गिरबीडे यांचे वकालतनाम्यासह टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा यांनी टपालामार्फत सादर केलेले दिनांक १४/०९/२०११ रोजीचे निवेदन.

३) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०११/जा.८०५, दि.११/१०/२०११, दि. २९/१०/२०११, ०४/११/२०११ व ०९/११/२०११.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलीस स्टेशन, मुंबई यांचे दिनांक २५/१०/२०११ रोजीचे लेखी अभिवेदन.

५) बार्जचा चालक वासुदेव कुसाजी धुरी, रंगीला प्रसाद शंभू राय व सुशांत किंशोरी मन्ना (मास्टर) यांचे दिनांक २५/१०/२०११ रोजीचे एकत्रित लेखी निवेदन.

६) या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०११/जा.८५०, दि.२९/१०/२०११.

७) टर्मिनल मॅनेजर, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. शिवडी यांचे दि.०१/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन व त्यासोबतची कागदपत्रे.

८) या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०११/जा.८७९, दि.०४/११/२०११.

९) शॉयनी शिपींग ॲण्ड लॉजीस्टिक प्रा.लि. चे संचालक यांचे दि.२७/१०/२०११ व ०८/११/२०११ रोजीचे लेखी निवेदन.

१०) चिफ मरिन मॅनेजर, श्री व्ही. के. हांडा, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांचे दि.११/११/२०११ रोजीचे टपालामार्फत सादर केलेले पत्र.

११) ॲड. श्रीकांत सी. गिरबीडे व टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा यांचे दिनांक १७/११/२०११ रोजीचे एकत्रित निवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.६३/२०११/जा. ९८९
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई २०.
दिनांक :- 02/12/२०११

## आदेश

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनाक १९/०८/२०११ रोजी श्री. राकेश शर्मा, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांना गुप्त बातमीदारमार्फत माहिती मिळाली की, समुद्रामध्ये " टँकर बार्ज टिना नं. ३ या बार्जमध्ये डिझेल विक्री

करण्याच्या उद्देशाने साठा करुन ठेवलेला आहे " सदरची माहिती मिळाल्यावरुन वरिष्ठ पोलिसं निरिक्षक, श्री. राकेश शर्मा यांनी पोलिस उपायुक्त (अंमलबजावणी), गुन्हे शाखा, मुंबई यांना दुरध्वनीवरुन कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस आयुक्त, यलोगेट विभाग व त्यांचे सहकारी / अधिकारी यांनी भाऊचा धक्का येथे पंचासह दिनांक २०/०८/२०११ रोजी सकाळी ६:१५ वाजता प्रवासी जेटी क्र. १ या गस्ती नौकेने सदर टँकर बार्ज टिना नं. ३ चा शोध घेणे कामी समुद्रगस्तीस रवाना झाले.

समुद्रगस्त करीत असताना सुमारे ११ वाजताच्या सुमारास मुघल लाईन दमानिया जेटी येथे पोहचले असता, बोट समुद्रात उभी असल्याचे दिसून आले. म्हणून सदर बोटीला लागून गस्ती नौका लावून घेण्यात आली. त्यानंतर पोलिस पथकाने सदरच्या उभ्या असलेल्या टँकर बार्ज टिना नं. ३ या बोटीत प्रवेश केला. सदर बोटीवर दोन इसम हजर होते. सहाय्यक पोलिस आयुक्त, यलोगेट विभाग, मुंबई यांनी नमूद बोटीतील इसमांना त्यांचे नाव पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांचे नाव वासुदेव कुसाजी धुरी (बार्जचा चालक) व रंगीला प्रसाद शंभू राय (सेंकड मास्टर) असे सांगितले. नमूद इसमाकडे बोट कोणाच्या मालकीबाबतची असल्याचे विचारणा केली असता, त्यांनी सायनी सिपिंग ॲण्ड लॉजिस्टिक कंपनी या नावावर असल्याचे सांगितले. तसेच सदर बोटीचा मास्टर हा सुशांत किशोरी मन्ना नामे असून तो सर्व बोटीचे व्यवहार पहातो असे सांगितले. सदर बोटीचे मोरा बंदर येथे टिना नं. ३ या नावाने नोंदणी झाली असून, सदर बोटीचा पेट्रोलजन्य पदार्थाचा वाहून नेण्यासाठी उपयोग केला जातो. सदर बोटीबाबत त्यांचेकडे कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी बोटीचे कागदपत्र मालकाकडे असल्याचे सांगितले. त्यांच्या संमतीने बोटीची तपासणी केली असता, बोटीमध्ये विविध क्षमतेचे पेट्रोलजन्य पदार्थ साठविण्यासाठी एकूण आठ कप्पे दिसून आले. सदरचे कप्पे पंचासमक्ष उघडून पाहिले असता रिकामे असल्याचे आढळून आले व ब्रीजच्या लगत समोरील बाजूस असणाऱ्या दोन टाक्यांमध्ये एकूण अंदाजे ४६,००० लिटर डिझेल व त्या टाक्यांच्या लगतच्या पुढील दोन्ही बाजूच्या टाक्यामध्ये एकूण अंदाजे ४,००० लिटर डिझेल असा ब्रिजलगतच्या समोरील बाजूस असणाऱ्या वर नमूद एकूण ४ टाक्यांमध्ये मिळून एकूण अंदाजे ५०,००० लिटर डिझेलचा साठा मिळून आला. सदर डिझेलचा साठा त्यांनी कोठून आणला. याबाबत त्यांनी कोणतेही समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. तसेच त्यांचेकडे वैध कागदपत्रे मिळून आले नाही.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितानी संगनमत करुन त्यांचे ताब्यात मिळालेल्या टिना नं. ३ या बोटीत विनापरवाना अवैधरित्या डिझेल हा पेट्रोलजन्य पदार्थ ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला व ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जिवीतास पोहचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसे इतका बंदोबस्त करण्याची जाणीवपूर्वक हयगय केली. पर्यायाने त्यांनी शासनाची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द [१] जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२) [२] दि मोटार स्पिरीट ॲण्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रीव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस)

ऑर्डर २००५ चे कलम ३ [३] दि प्रिव्हेन्शन ऑफ ब्लॅक मार्केटिग ॲण्ड मेन्टेनन्स ऑफ इशेन्सीयन कमोडीटीज ॲक्ट १९८० चे कलम ३ [४] दि पेट्रोलियम प्रॉडेक्ट (मेनटेन ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲन्ड सप्लायर्स) ऑर्डर १९९९ चे कलम ३, ४, ५, ६, ७ तसेच [५] भा. द. वि. चे कलम २८५, ३४ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३३/२०११, दि.२०/०८/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले. जप्त केलेला माल व बोट हे वाहतूकीस अवजड असल्याने सदरची बोट व त्यामध्ये साठविलेले डिझेल हे पेट्रोलजन्य पदार्थाच्या मालासह मोघल लाईन दमानिया जेटी येथे सुरक्षित पोलिस पहाऱ्यात ठेवण्यात आली आहे.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | टँकर बार्ज टिना नं. ३ | १ नग | ३,४०,००,०००/- |
| २ | डिझेलचा साठा | ५०००० लिटर | २२,६६,०००/- |
| | | एकूण | ३,६२,६६,०००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २५/१०/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस निरीक्षक श्री एस. डी. भंडारे उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस ॲड. श्रीकांत सी. गिरबीडे यांचे वकालतनाम्यासह टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली न्होन्हा उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे निवेदन वाचावे क्र. २ अन्वये यापूर्वीच टपालामार्फत सादर केल्याचे सांगून ते कायम असल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे सदर सुनावणीस बार्जचा चालक वासुदेव कुसाजी धुरी, रंगीला प्रसाद शंभू राय व सुशांत किशोरी मन्ना (मास्टर) हे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ५ अन्वये एकत्रित लेखी निवेदन सादर केले.

टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली न्होन्हा यांनी सादर केलेल्या निवेदनात सदर जप्त डिझेलचा साठा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीकडून दिनांक १९/०८/२०११ रोजी घेतल्याचे नमुद करुन चलनाच्या छायांकित प्रति सादर केल्या. सबब, याबाबत वाचावे क्र. ६ चे पत्रान्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीकडून अहवाल मागविण्यात आला व पुढील सुनावणी दिनांक ०१/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०१/११/२०११ रोजीच्या सुनावणीस इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.चे उप व्यवस्थापक श्री डी. एस. दिघे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ७ अन्वये अहवाल सादर केला. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस निरीक्षक श्री एस. डी. भंडारे, टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा हे व त्यांचे वतीने ॲड. श्रीकांत गिरबिडे उपस्थित राहीले. सुनावणीचे वेळी इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.चे उप व्यवस्थापक यांना मे. शायनी शिपींग कॉर्पोरेशन अथवा टँकर बार्ज टिना नं. ३ यामधील डिझेल पुरवठा बाबतचा करारनामा सादर करण्यास सुचित केले असता, तसा कंपनी बरोबर करारनामा नसल्याचे सांगून करारनामा आवश्यक नसल्याचे सांगीतले. उपभोक्त्यांनी मागणी नोंदविल्यानुसार त्यांना डिझेलचा पुरवठा केला जात असल्याचेही सांगीतले. तसेच मागणी नोंदविण्याबाबतचे सर्व कामकाज त्यांचे मरीन विभागामार्फत होत असून त्यांच्याकडे मागणी केल्यानुसार त्यांच्याकडून नमुद उपभोक्त्यास पुरवठा करण्यात येत असल्याचे सांगीतले. सबब, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.चे चिफ मरीन मॅनेजर यांचेकडून वाचावे क्र. ८ चे पत्रान्वये अहवाल मागविण्यात आला व पुढील सुनावणी दिनांक ०८/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., मरीन विभागाचे चिफ मरीन मॅनेजर श्री व्ही. के. हांडा व मरीन मॅनेजर श्री एस. बी. मनोहर उपस्थित राहीले व त्यांनी त्यांचे निवेदन टपालामार्फत सादर करणार असल्याचे सांगीतले. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तथा पोलीस निरीक्षक श्री एस. डी. भंडारे, टँकर बार्ज टिना-३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा हे व त्यांचे वतीने ॲड. श्रीकांत गिरबिडे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ९ अन्वये निवेदन सादर केले. सबब, पुढील सुनावणी दिनांक १७/११/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दरम्यान इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., मरीन विभागाचे चिफ मरीन मॅनेजर श्री व्ही. के. हांडा यांनी त्यांचे निवेदन वाचावे क्र. १० अन्वये टपालामार्फत या कार्यालयास सादर केले.

दिनांक १७/११/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा हे व त्यांचे वतीने ॲड. श्रीकांत गिरबिडे उपस्थित राहीले व त्यांनी वाचावे क्र. ११ अन्वये एकत्रित निवेदन सादर केले.

सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित यलोगेट पोलिस स्टेशनचे पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलीस अधिकारी यांनी युक्तिवाद केला की, दिनांक १९/०८/२०११ रोजी बोट गेट भाऊचा धक्का, माझगांव या ठिकाणी अंदाजे ५०,००० लिटर बेहिशोबी व अनधिकृतरित्या भरलेले डिझेल मिळून आलेले असून ते जप्त करण्यात आलेले आहे. सदर डिझेलबाबत टिना ३ या बार्जचे मास्टर, सेंकड मास्टर, इंजिन ड्रायव्हर तसेच नमूद

बार्जचे मालक यांनी काहीही माहिती व साठासंबंधीचे कागदपत्रे सादर केलेले नाही. गुन्ह्याचे प्राथमिक तपासामध्ये जप्त करण्यात आलेले डिझेलची मोजदाद करण्याकरिता त्यांच्या वतीने मे. ज्यो एन्ड ज्योएल या कंपनीची नियुक्ती करण्यात आली व त्यांनी दिलेल्या अहवालानुसार जप्त करण्यात आलेले डिझेल ३७,२९० कि.लि. असल्याचे त्यांनी त्यांच्या लेखी अहवालामध्ये नमूद केले आहे. गुन्हा दाखल केला त्यावेळी आरोपी किंवा त्यांचा कोणाही प्रतिनीधीने पोलीसांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे सादर केली नव्हती. त्यामुळे जप्त केलेल्या डिझेलचा अवैधरितीने साठा केला असल्याच्या संशयावरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त करण्यात आलेले डिझेल हे यातील आरोपी स्टॅनली नऱ्होन्हा यांनी त्यांच्या मालकीच्या शायनी शिपींग अॅण्ड लाजीस्टीक या कंपनीने इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या कंपनीकडून दिनांक १९/०८/२०११ रोजी विकत घेतले होते, अशी माहिती पोलीस तपासामध्ये दिलेली असून, सदर डिझेल त्यांनी त्यांच्या मालकीच्या टिना-३ या बार्जच्या स्वत:च्या वापराकरीता विकत घेतले असल्याचे इनव्हॉईसमध्ये नमुद केले आहे. याबाबत आयओसी शिवडी टर्मीनल १ येथील उप प्रबंधक यांचेकडे चौकशी केली असता, टर्मिनल १ वरुन चार टॅंकर क्र. एमएच-०४-डीके-४९४६, एमएच-०४-सीजी-४४७७, एमएच-०४-सीजी-४८१७ व एमएच-०४-बीयू-५७३५ यांचेद्वारे बोटगेट या ठिकाणी नमुद डिझेलची शायनी शिपींग कंपनीच्या टिना-३ या बोटीमध्ये भरणा केले असल्याचे सांगीतले. गुन्ह्याच्या अधिक तपासामध्ये शायनी शिपींग या कंपनीकडे भारतीय नौदलाला डिझेल तसेच फर्नेस ऑईलचा पुरवठा करण्याचे कंत्राट आयओसी या तेल कंपनीने दिले असल्याचे आढळून आले आहे. यातील जप्त करण्यात आलेला टिना-३ हा बार्ज समुद्रात उभ्या असलेल्या जहाजांना इंधन पुरवठयाकरीता शायनी शिपींग कंपनीकडून वापरण्यात येत होता. तसेच त्याकरीता कंपनीकडे आवश्यक ते कागदपत्रे व परवाने उपलब्ध आहेत, असे सांगून तसे लेखी अभिवेदन सादर केले.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित बार्जचा चालक वासुदेव कुसाजी धुरी, रंगीला प्रसाद शंभू राय व सुशांत किशोरी मन्ना (मास्टर) यांनी युक्तिवाद केला की, ते बार्जवर कर्मचारी असून, टिना-३ या बार्जवर सर्व्हीस टॅंकमध्ये असलेले डिझेल अंदाजे ५० हजार लिटर असून, सदरची टिना-३ बार्जचे मालक स्टेनी उर्फ स्टॅनली नऱ्होन्हा आहेत व ही बार्ज शायनी शिपींग यांचे वैयक्तिक मालकीची आहे. जप्त डिझेल त्याचे मालकास परत देण्यात त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगून तसेच एकत्रित लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २५/१०/२०११ रोजीच्या सुनावणीस टिना-३ या बार्जचे मालक स्टॅनली नरोन्हा व त्यांचे वतीने अॅड. श्रीकांत गिरबिडे यांनी उपस्थित राहुन युक्तिवाद केला की, ते टिना-३ या बार्जचे मालक असुन शायनी शिपींग अॅन्ड लाजेस्टिक प्रा. लि. संचालक आहेत. त्यांच्या मालकीचे तीन बार्ज असुन त्यांचेकडे बंकर व पुरवठादार म्हणुन तसेच पेट्रोलियम पदार्थाचे वाहतुकीकरीता शिपींग, मरीन व कस्टम या विभागांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र आहे. टिना ३ या व इतर बार्ज मध्ये असलेले मटेरियल हे आयओसी, एचपीसी व बीपीसी या तेल कंपन्यांकडून खरेदी केले

जाते. तसेच ते व्यावसायीक असुन त्यांनी बार्ज संबंधी सर्व कागदपत्रे पोलिसांना दिले आहे. दिनांक ०३/०९/२०११ रोजी त्यांना यलो गेट पोलिसांनी अटक केली असुन मा. न्यायालयाने त्यांना जामीनावर मुक्त केले आहे. मेसर्स शायनी शिपींग अॅन्ड लॉजेस्टिक लि. या कंपनीचे नावे दिनांक ०७/०१/२०१० व १६/०८/२०१० रोजी हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन या तेल कंपनीकडून डिझेल खरेदी केले आहे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीकडून दिनांक १२/०१/२०११ रोजी लो सल्फर हाय फ्लॅश तसेच दिनांक १९/०८/२०११ रोजी हाय फ्लॅश ऑईल खरेदी केले असुन सदरचा साठा व इतर मटेरियल हे पोलिसांच्या ताब्यात असल्याचे सांगितले. टिना-३ हे बार्ज व त्यामधील ५०,००० लिटर साठयाचे ते मालक आहेत. आपण दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यास ते तयार असुन जप्त मुद्देमाल त्यांना परत मिळण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०१/११/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.चे उप व्यवस्थापक श्री डी. एस. दिघे यांनी युक्तीवाद केला की, त्यांच्या कंपनीच्या वतीने देण्यात आलेल्या चलनांपैकी चलन क्रमांक ६४८७१३००१ दिनांक १९/८/२०११ व चलन क्र ६४८८०७९३८ दिनांक २४/८/२०११ या दोन्ही चलनांवरील उपभोक्ताच्या नावामध्ये संगणकीय चुक झालेली असुन सदरच्या चलनावरील खालील भागात टिना असे नांव नमुद केले आहे व त्यासोबत दिनांक १२/०१/२०११ रोजी मे. शायनी शिपींग अॅन्ड लॉजेस्टिक प्रा. लि. यांना पुरवठा करण्यात आलेल्या दोन टँकरच्या चलनांच्या छायांकित प्रती सादर केल्याचे सांगुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०१/११/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर बार्ज टिना-३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा हे व त्यांचे वतीने अॅड. श्रीकांत गिरबिडे यांनी युक्तिवाद केला की, टँकर बार्ज टिना-३ हे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीशी करारबध्द असुन व सदर कंपनीच्या वडाळा/शिवडी या टर्मिनल मधुन काळे व सफेद ऑईल चे उचल करुन भारतीय नौसेना च्या बोटींना पुरवठा करीत असल्याचे सांगितले तसेच त्यांच्या मालकीचे मे. शायनी शिपींग अॅन्ड लॉजेस्टिक लि. या कंपनीचे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीशी वाहतुक करारनामा आहे व त्यानुसार दिनांक १९/०८/२०११ रोजी व यापूर्वी दिनांक १२/०१/२०११ रोजी सदर तेल कंपनीकडून त्यांच्या मालकीच्या असलेल्या तीन बार्ज करीता डिझेल साठयाची उचल केल्याचे सांगुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा हे व त्यांचे वतीने अॅड. श्रीकांत गिरबिडे यांनी युक्तिवाद केला की दिनांक २०/०८/२०११ रोजी यलोगेट पोलिस स्टेशन यांना मिळालेल्या चुकीच्या बातमीनुसार त्यांचा नमुद बार्ज जप्त करण्यात आला. दिनांक १५ मे ते १५ सप्टेंबर या कालावधीमध्ये पावसाळा असल्याने समुद्र किनारी अँकरवर उभे असुन सदरच्या कालावधीत त्यांचेकडील जनरेटर व इतर साहित्यासाठी डिझेल साठयाची आवश्यकता असते. दिनांक १९/८/२०११ रोजी त्यांनी आय. ओ. सी. कंपनीकडून ४८,००० लिटर डिझेल साठा त्यांच्या आवश्यकतेनुसार खरेदी केला असुन व त्याकरीता त्यांचा तेल

कंपनीशी करार नसल्याचे सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी आय. ओ. सी. व एम.बी.पी.टी. या कंपन्यांशी असलेल्या विवीध करारनाम्याचे छायांकित प्रती सादर केल्या व त्यांनी त्यांच्या मालकीच्या तीन बार्जच्या दैनंदिन वापराकरीता डिझेल खरेदी केले असुन सदर गुन्हा नोंद प्रकरणी त्यांचे बार्ज उभे असल्याने आर्थिक नुकसान होत असुन ते परत मिळावे असे सांगुन त्यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०८/११/२०११ रोजीच्या सुनावणीस श्री व्ही. के. हांडा, चिफ मरिन मॅनेजर व श्री एस. बी. मनोहर, मरिन मॅनेजर, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांनी युक्तिवाद केला की, हाय फ्लॅश हाय स्पिड डिझेल चा वापर बोटींसाठी केला जात असुन सदर साठयाचा पुरवठा टँकरद्धारे मॅलेट बंदर येथे बोटींना अथवा करारबध्द बार्जमध्ये थेट पुरवठा करुन तो साठा मुंबई पोर्ट विभागातील बोटींना पुरवठा करण्यासाठी दिला जातो. कंपनीकडील करारबध्द बार्ज व इतर नोंदणीकृत पेट्रोलियम पदार्थाचे समुद्राद्धारे वाहतुक करणारे बोटींसाठी त्यांच्या स्वत:च्या वापरासाठी सदरचा साठा दिला जातो. त्यांच्या कंपनीकडील नोंदणीकृत ग्राहकांनी हाय फ्लॅश हाय स्पिड डिझेल साठी मागणी केल्यानंतर व साठयाचे रकमेचा भरणा केल्यानंतर प्रोफार्मा इन्व्हाईस दिला जात असुन त्यानुसार पुरवठा केला जातो. मे शायनी शिपींग ॲन्ड लॉजेस्टिक लि. यांनी दिनांक १७/०८/२०११ रोजी ४० मेट्रीक टन साठयाची मागणी नोंदविली होती त्यानुसार दिनांक १९/०८/२०११ रोजी शिवडी टर्मिनल येथुन सदर कंपनीस ४०.३५२ मेट्रीक टन हाय फ्लॅश हाय स्पिड डिझेलचा पुरवठा "टिना" या बार्ज करीता केलेला असल्याचे सांगुन तसे लेखी निवेदन त्यांनी दिनांक ११/११/२०११ रोजीच्या पत्रान्वये टपालामार्फत सादर केले.

दिनांक १७/११/२०११ रोजीच्या सुनावणीस टँकर बार्ज टिना नं. ३ बोटीचे मालक स्टॅनली नऱ्होन्हा हे व त्यांचे वतीने ॲड. श्रीकांत गिरबिडे यांनी युक्तिवाद केला की, मे. शायनी शिपींग ॲन्ड लॉजेस्टिक या कंपनीचे ते मालक असुन त्यांच्या मालकीचे टिना, टिना १ व टिना ३ असे तीन बार्ज आहेत. सदर कंपनी व बार्ज सरकारी दरबार रितसर नोंदणी व परवानगी घेवुन व्यवहार करीत आहेत. तसेच त्यांच्या कंपनीने गैरकायदेशीर कृत्य केल्याचे असे कोठल्याही कार्यालयात नोंद नाही. तीनही बार्ज साठी लागणारे इंधन हे भारतीय तेल कंपन्यांमार्फत शायनी शिपींग कंपनीच्या नावाने खरेदी केले जाते. भारतीय तेल कंपनीने शायनी शिपींग कंपनीच्या मालकीच्या असलेल्या बार्ज बाबत सर्व मालकी व रजिस्ट्रेशन व तेल घेण्यासाठी लागणारे सर्व परवाने व कागदपत्रांचे अवलोकन करुनच मोठया प्रमाणात डिझेल तेलाचा पुरवठा कंपनीच्या नावाने होतो. सदरची टिना ३ हे बार्ज मागिल ३ महिन्यापासुन बंद असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे कामगारांचे पगार देणे बाकी असून जवळपास ३० ते ३५ लाखाची थकबाकी झाली असल्याने ते कर्जबाजारी झालेले आहेत. त्यामुळे सहानुभुतीपुर्वक विचार करुन सदरची बोट त्यांना अटी व शर्तीची पुर्तता करुन घेवून परत करावे. दिनांक १३/९/२०११ रोजी टपालात सादर केलेल्या निवेदनात टिना ३ या बार्ज मध्ये आढळुन आलेल्या ५०००० लिटर डिझेल साठ्याचे कायदेशीर मालक असल्याचे

नमुद केले असल्याने त्याबाबत त्यांनी खुलासा केला की, शायनी शिपींग ॲन्ड लाजेस्टिक या कंपनीच्या नावे तीनही बार्ज करीता इंधन खरेदी केले जाते. पोलीसांनी गुन्हा दाखल करतांना एफ. आय. आर. व रिमांड अर्जामध्ये अंदाजे ५०००० लिटर डिझेल लिहीले होते परंतु दिनांक १९/८/२०११ रोजी आय. ओ. सी. कंपनीमार्फत रितसर एकरकमी रक्कम भरुन चलनाद्वारे भरणा करुन शायनी शिपींग कंपनीच्या नावे "टिना" या बार्ज करीता ४८००० लिटर डिझेल खरेदी केले आहे. त्यांच्या शिपींग कंपनीने यापुर्वी सुध्दा दिनांक ७/१/२०१० रोजी २०,००० लिटर, दिनांक २/६/२०१० रोजी १२,००० लिटर, दिनांक १६/८/२०१० रोजी १८,००० लिटर व दिनांक २२/१/२०११ रोजी २४,००० लिटर डिझेलची खरेदी विविध भारतीय तेल कंपन्यांकडून रोख रकमेद्वारे चलनाद्वारे केलेली आहे. दिनांक २५/१०/२०११ रोजी येलोगेट पोलिस ठाणे मार्फत सादर केलेल्या अहवालामध्ये खाजगीरित्या डिझेलची खरेदी करुन मे. ज्यो ॲन्ड ज्योएल या कंपनीकडून "टिना ३" या बार्ज मध्ये ३७,२९० कि.लि. डिझेलचा साठा असल्याचे नमुद केले आहे बाकी डिझेल हे शायनी शिपींग ॲन्ड लॉजेस्टिकच्या "टिना" बार्ज मध्ये अंदाजे ११,००० लिटर डिझेल टाकले आहे. तसेच शायनी शिपींग कंपनीच्या नावे "टिना, टिना २ व टिना ३" या स्वतःच्या वापर इंजीन, जनरेटर व कार्बोपंपच्या वापराकरीता तेल खरेदी केले जात असुन त्यांचे तीन बार्ज आय. ओ. सी. व भारतीय नौकादलासोबत करारबध्द असल्यामुळे ज्या ज्या वेळेस बार्जची आवश्यकता असते त्या त्या वेळेस त्यांना पुरवठा केला जातो. सदर परिस्थितीचा सहानुभुतीपूर्वक विचार करुन त्यांचे "टिना ३" हे बार्ज व डिझेल सुपुर्तनाम्यावर देण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनाक १९/०८/२०११ रोजी श्री. राकेश शर्मा, वरिष्ठ पोलिस निरिक्षक, गुन्हे शाखा नियंत्रण, मुंबई यांना गुप्त बातमीदारमार्फत माहिती मिळाली की, समुद्रामध्ये " टँकर बार्ज टिना नं. ३ या बार्जमध्ये डिझेल विक्री करण्याच्या उद्देशाने साठा करुन ठेवलेला आहे " सदरची माहिती मिळाल्यावरुन वरिष्ठ पोलिस निरिक्षक, श्री. राकेश शर्मा यांनी पोलिस उपायुक्त (अंमलबजावणी), गुन्हे शाखा, मुंबई यांना दुरध्वनीवरुन कळवून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस आयुक्त, यलोगेट विभाग व त्यांचे सहकारी / अधिकारी यांनी भाऊचा धक्का येथे पंचासह दिनांक २०/०८/२०११ रोजी सकाळी ६:१५ वाजता प्रवासी जेटी क्र. १ या गस्ती नौकेने सदर टँकर बार्ज टिना नं. ३ चा शोध घेणे कामी समुद्रगस्तीस रवाना झाले. समुद्रगस्त करीत असताना सुमारे ११ वाजताच्या सुमारास मुघल लाईन दमानिया जेटी येथे पोहचले असता, बोट समुद्रात उभी असल्याचे दिसून आले.

म्हणून सदर बोटीला लागून गस्ती नौका लावून घेण्यात आली. त्यानंतर पोलिस पथकाने सदरच्या उभ्या असलेल्या टँकर बार्ज टिना नं. ३ या बोटीत प्रवेश केला. सदर बोटीवर दोन इसम हजर होते. सहाय्यक पोलिस आयुक्त, यलोगेट विभाग, मुंबई यांना नमूद बोटीतील इसमांनी त्यांची नावे वासुदेव कुसाजी धुरी (बार्जचा चालक) व रंगीला प्रसाद शंभू राय (सेंकड मास्टर) असे सांगितले. नमूद इसमाकडे बोट कोणाच्या मालकीबाबतची असल्याचे विचारणा केली असता, त्यांनी शायनी शिपिंग ॲण्ड लॉजिस्टिक कंपनी या नावावर असल्याचे सांगितले. तसेच सदर बोटीचा मास्टर हा सुशांत किशोरी मन्ना नामे असून तो सर्व बोटीचे व्यवहार पहातो असे सांगितले. सदर बोटीचे मोरा बंदर येथे टिना नं. ३ या नावाने नोंदणी झाली असून, सदर बोटीचा पेट्रोलजन्य पदार्थाचा वाहून नेण्यासाठी उपयोग केला जातो. सदर बोटीबाबत त्यांचेकडे कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी बोटीचे कागदपत्र मालकाकडे असल्याचे सांगितले. त्यांच्या संमतीने बोटीची तपासणी केली असता, बोटीमध्ये विविध क्षमतेचे पेट्रोलजन्य पदार्थ साठविण्यासाठी एकूण आठ कप्पे दिसून आले. सदरचे कप्पे पंचासमक्ष उघडून पाहिले असता रिकामे असल्याचे आढळून आले व ब्रीजच्या लगत समोरील बाजूस असणाऱ्या दोन टाक्यांमध्ये एकूण अंदाजे ४६,००० लिटर डिझेल व त्या टाक्यांच्या लगतच्या पुढील दोन्ही बाजूच्या टाक्यामध्ये एकूण अंदाजे ४,००० लिटर डिझेल असा ब्रिजलगतच्या समोरील बाजूस असणाऱ्या वर नमूद एकूण ४ टाक्यांमध्ये मिळून एकूण अंदाजे ५०,००० लिटर डिझेलचा साठा मिळून आला. सदर डिझेलचा साठा त्यांनी कोठून आणला. याबाबत त्यांनी कोणतेही समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. तसेच त्यांचेकडे वैध कागदपत्रे मिळून आले नाही. यावरुन सदर टँकर बार्ज टिना नं. ३ व त्यामधील ५०,००० लिटर डिझेलचा साठा जप्त करण्यात आला. जप्त केलेला माल व बोट हे वाहतूकीस अवजड असल्याने सदरची बोट व त्यामध्ये साठविलेले डिझेल हे पेट्रोलजन्य पदार्थाच्या मालासह मोघल लाईन दमानिया जेटी येथे सुरक्षित पोलिस पहाऱ्यात ठेवण्यात आली आहे.

सुनावणीचे वेळी यलोगेट पोलिस स्टेशनचे तपासी पोलीस अधिकारी यांनी केलेल्या खुलाशात, दिनांक १९/०८/२०११ रोजी बोट गेट भाऊचा धक्का, माझगांव या ठिकाणी अंदाजे ५०,००० लिटर बेहिशोबी व अनधिकृतरित्या भरलेले डिझेल मिळून आलेले असून ते जप्त करण्यात आलेले आहे. तसेच घटनास्थळी आरोपी किंवा त्यांचा कोणत्याही प्रतिनीधीने पोलीसांना कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे सादर केली नव्हती. त्यामुळे जप्त केलेल्या डिझेलचा अवैधरितीने साठा केला असल्याने गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचे नमुद केले आहे. त्याचप्रमाणे शायनी शिपींग या कंपनीकडे भारतीय नौदलाला डिझेल तसेच फर्नेस ऑईलचा पुरवठा करण्याचे कंत्राट आयओसी या तेल कंपनीने दिले असुन जप्त करण्यात आलेला टिना-३ हा बार्ज समुद्रात उभ्या असलेल्या जहाजांना इंधन पुरवठयाकरीता शायनी शिपींग कंपनीकडून वापरण्यात येत असल्याचे पोलिसांना तपासात आढळून आले असल्याचे नमुद केले आहे.

इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. या तेल कंपनीस दिनांक २९/१०/२०११ रोजीच्या पत्रान्वये दिनांक १९/०८/२०११ रोजी टिना-३ या बार्जकरिता पुरवठा करण्यात आलेल्या डिझेल साठयाच्या चलनांसह तपशिल व सदरचा साठा हा टिना-३ या बार्जला इंधन म्हणून वापरास अथवा नौदलाच्या बोटींसाठी पुरवठा करण्याकरीता देण्यात आला होता किंवा कसे? याबाबतचे तपशिल सादर करण्यास सुचित केले असता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. चे उप व्यवस्थापक श्री डी. एस. दिघे यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, त्यांच्या कंपनीच्या वतीने देण्यात आलेल्या चलनांपैकी चलन क्रमांक ६४८७१३००१ दिनांक १९/८/२०११ या चलनावरील उपभोक्त्याचे नांव एम.वी. अंबुजा, पनवेल व चलन क्र. ६४८८०७९३८ दिनांक २४/८/२०११ या दोन्ही चलनांवरील उपभोक्ताच्या नावामध्ये संगणकीय चुक झालेली असुन सदरच्या चलनावरील खालील भागात "टिना" असे नांव नमुद केले असून त्यासोबत यापूर्वी दिनांक १२/१/२०११ रोजी मे. शायनी शिपींग अॅन्ड लॉजेस्टिक प्रा. लि. यांना पुरवठा करण्यात आलेल्या दोन टॅंकरच्या चलनांच्या छायांकित प्रती सादर केल्याचे नमूद केले आहे. तसेच श्री व्ही. के. हांडा, चिफ मरिन मॅनेजर व श्री एस. बी. मनोहर, मरिन मॅनेजर, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि. यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात, मे शायनी शिपींग अॅन्ड लॉजेस्टिक लि. यांनी दिनांक १७/८/२०११ रोजी ४० मेट्रीक टन साठयाची मागणी नोंदविली होती. त्यानुसार दिनांक १९/८/२०११ रोजी शिवडी टर्मिनल येथुन सदर कंपनीस ४०.३५२ मेट्रीक टन हाय फ्लॅश हाय स्पिड डिझेलचा पुरवठा "टिना" या बार्ज करीता केलेला असल्याचे नमूद केले आहे.

टॅंकर बार्ज टिना-३ बोटीचे मालक स्टॅनली नन्होन्हा हे व त्यांचे वतीने अॅड. श्रीकांत गिरबिडे यांनी सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाशात, टॅंकर बार्ज टिना-३ हे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीशी करारबध्द असुन व सदर कंपनीच्या वडाळा/शिवडी या टर्मिनल मधुन काळे व सफेद ऑईल चे उचल करुन ते भारतीय नौसेना च्या बोटींना पुरवठा करीत असतात. व त्यांच्या मालकीचे मे. शायनी शिपींग अॅन्ड लॉजेस्टिक लि. या कंपनीचे इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीशी वाहतुक करारनामा आहे. दिनांक २०/८/२०११ रोजी यलोगेट पोलिस स्टेशन यांना मिळालेल्या चुकीच्या बातमीनुसार त्यांचा नमुद बार्ज जप्त करण्यात आला. दिनांक १५ मे ते १५ सप्टेंबर या कालावधीमध्ये पावसाळा असल्याने समुद्र किनारी त्यांचे बार्ज अॅंकरवर उभे असुन सदरच्या कालावधीत त्यांचेकडील जनरेटर व इतर साहित्यासाठी डिझेल साठयाची आवश्यकता असते. दिनांक १९/८/२०११ रोजी त्यांनी आय. ओ. सी. कंपनीकडून "४८,००० लिटर डिझेल साठा" त्यांच्या आवश्यकतेनुसार खरेदी केला असल्याचे व त्याकरीता डिझेल खरेदीसाठी त्यांचा तेल कंपनीशी करार नसल्याचे नमुद केले आहे. तसेच तदनंतर केलेल्या खुलाशात, मे. शायनी शिपींग अॅन्ड लॉजेस्टिक या कंपनीचे ते मालक असुन त्यांच्या मालकीचे "टिना, टिना २ व टिना ३" असे तिन बार्ज असून तीनही बार्ज साठी लागणारे इंधन हे भारतीय तेल कंपन्यांमार्फत शायनी शिपींग

कंपनीच्या नावाने खरेदी केले जाते. पोलीसांनी गुन्हा दाखल करतांना एफ. आय. आर. व रिमांड अर्जामध्ये अंदाजे "५०,००० लिटर डिझेल" लिहीले होते. परंतु दिनांक १९/८/२०११ रोजी आय. ओ. सी. कंपनीमार्फत शायनी शिपींग कंपनीच्या नावे टिना या बार्ज करीता "४८,००० लिटर डिझेल" खरेदी केले आहे. दिनांक २५/१०/२०११ रोजी यलोगेट पोलिस ठाणे मार्फत सादर केलेल्या अहवालामध्ये खाजगीरित्या डिझेलची खरेदी करुन मे. ज्यो ॲन्ड ज्योएल या कंपनीकडून "टिना ३" या बार्ज मध्ये ३७,२९० कि.लि. "डिझेलचा साठा" असल्याचे नमुद केले आहे. उर्वरीत अंदाजे ११,००० लिटर "डिझेल" हे शायनी शिपींग ॲन्ड लॉजेस्टिकच्या "टिना" बार्ज मध्ये टाकले आहे. शायनी शिपींग कंपनीच्या नावे "टिना, टिना-२ व टिना-३" या स्वत:च्या वापर इंजीन, जनरेटर व कार्बोपंपच्या वापराकरीता तेल खरेदी केले जात असुन, त्यांचे तीन बार्ज आय. ओ. सी. व भारतीय नौकादलासोबत करारबध्द असल्यामुळे ज्या ज्या वेळेस बार्जची आवश्यकता असते त्या त्या वेळेस त्यांना पुरवठा केला जात असल्याचे नमुद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी घटनास्थळी आढळून आलेल्या डिझेलची मोजदाद केली असता, "५०,००० लिटर डिझेलचा साठा" असल्याचा व त्याप्रमाणे गुन्हा दाखल केला असल्याचा उल्लेख पंचनाम्यात केलेला आहे. तथापी, यलोगेट पोलिसांनी जप्त डिझेल साठयाची पुन्हा मोजदाद करण्याकरिता मे. ज्यो एन्ड ज्योएल या कंपनीची नियुक्ती केली व सदर जप्त "डिझेलचा साठा ३७,२९० कि.लि." असल्याचा तसा लेखी अहवाल त्यांचेकडून प्राप्त करुन घेतला. प्रकरणी जप्त करण्यात आलेल्या डिझेलची पुन्हा मोजदाद करण्याकरिता जप्त मुद्देमालाच्या मालक यांनी पोलिसांकडे तशी कोणतीही मागणी केल्याचे प्रकरणी दिसून येत नसले तरी, जप्त डिझेलचा साठा किती आहे, याची खातरजमा करण्याकरीता पोलीसांनी महाराष्ट्र शासनाचे वैध मापनशास्त्र या विभागाकडून मोजदाद करणे आवश्यक होते, परंतू पोलिसांनी संबंधित शासकिय विभागाकडून जप्त डिझेल साठ्याची मोजदाद न करता त्यांनी त्यांचे स्तरावर मे. ज्यो ॲन्ड ज्योएल या खाजगी सर्व्हे कंपनीकडून पुन्हा जप्त डिझेल साठयाचे मोजदाद करुन घेतले असल्याचे दिसून येते. तथापी, जप्त डिझेल साठ्याची पुन्हा मोजदाद करण्याची पोलीसांना काय आवश्यकता होती, याबाबत कोणताही खुलासा पोलीसांनी केलेला नाही.

जप्त साठ्याचे मालक यांनी, एकूण उचल केलेल्या डिझेल साठ्यापैकी अंदाजे ११,००० लिटर डिझेल साठा "टिना" बार्ज मध्ये टाकले असल्याने "टिना-३" नावाच्या बार्जमध्ये ३७,२९० लिटर डिझेल साठा असल्याचा खुलासा केला आहे. त्याचप्रमाणे मे. शायनी शिपींग ॲन्ड लॉजेस्टिक या कंपनीने त्यांच्या "टिना" नावाच्या बार्ज करीता तेल कंपनीकडून डिझेल खरेदी केले असल्याचे त्यांनी सादर केलेल्या चलनावरुन दिसून येत असले तरी, सदर कंपनीचे नावे "टिना, टिना-२ व टिना-३" हे तीन बार्ज आहेत. वास्तविकत: इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेलकंपनीच्या चलनांचे अवलोकन केले असता त्यांनी नमुद डिझेल साठ्याचा पुरवठा "टिना" या बार्जकरीताच

& DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

केल्याचे स्पष्ट होत आहे व तसे त्यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात नमुद केले आहे. यावरुन दिनांक १९/०८/२०११ रोजी उचल करण्यात आलेल्या डिझेल साठयाचे "टिना-३" या बार्जमध्ये पुरवठा झाला नसल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे "टिना-३" या बार्जमधील आढळुन आलेल्या ५०,००० लिटर डिझेल साठयाबाबत साशंकता निर्माण होते. यास्तव सदर गुन्ह्यात "टिना-३" या बार्जमध्ये जप्त करण्यात आलेल्या डिझेलच्या साठयाबाबत कोणताही कायदेशीर पुरावा अथवा कागदपत्रे आरोपी यांनी सादर केलेले नसुन त्यांनी सादर केलेले निवेदन हे मोंघम स्वरुपाचे तसेच ते पोलिस अथवा आयओसी कंपनीचे निवेदनांशी विसंगत असल्याचे व दिशाभुल करणारे असल्याचे निदर्शनास येत आहे. सद्य:स्थितीत जप्त करण्यात आलेल्या हाय फ्लॅश डिझेलचा साठा "टिना-३" या बार्जकरिता उचल केल्याचे सकृतदर्शनी दिसून येत नाही. या वस्तूस्थितीवरुन "टिना-३" या बार्जमधील जप्त करण्यात आलेला डिझेलचा साठा हा गैरमार्गाने व बेकायदेशीरित्या मिळविला असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून मा. न्यायालयात याबाबत सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, जप्त करण्यात आलेला डिझेलचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निर्ष्कषाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेले "टिना -३" बार्ज हे शायनी शिपींग ॲण्ड लॉजिस्टीक प्रा.लि. यांच्या मालकीची असल्याचे त्यांनी सादर केलेल्या समुद्री वाणीज्य विभाग यांचे लायसन्स क्र. पीएल/२०११/ ७०००७६९३ दिनांक १४/०७/२०११ अन्वये दिसून येते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनात, मे. शायनी शिपींग कंपनीच्या नावे टिना, टिना-२ व टिना-३ या स्वत:च्या वापर इंजीन, जनरेटर व कार्बोपंपच्या वापराकरीता तेल खरेदी केले जात असुन त्यांचे तीन बार्ज आय. ओ. सी. व भारतीय नौकादलासोबत करारबध्द असल्यामुळे ज्या ज्या वेळेस बार्जची आवश्यकता असते त्या त्या वेळेस त्यांना पुरवठा केला जातो. त्यानुसार तेल कंपनीकडून डिझेल खरेदी केले असल्याचे नमुद केले आहे. जप्त डिझेलच्या साठ्याबाबत बार्ज मालकाने तेल कंपनीचे चलन सादर केले असून, चलनावर फक्त "टिना" असे नमूद केले आहे. यावरुन इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेलकंपनीच्या चलनांचे अवलोकन केले असता त्यांनी नमुद डिझेल साठ्याचा पुरवठा "टिना" या बार्जकरीताच केल्याचे स्पष्ट होत आहे व तसे त्यांनी सुनावणीचे वेळी केलेल्या खुलाशात नमुद केले आहे. दिनांक १९/०८/२०११ रोजी आय.ओ.सी. या तेल कंपनीच्या चलनांवरील नमूद डिझेलचा साठा हा टिना-३ या बार्ज करीता पुरवठा केला नसल्याचे दिसून येत असून, यावरुन "टिना" या त्याच कंपनीच्या नावे असलेल्या बार्जकरीताच सदर डिझेलची तेल कंपनीतून उचल केल्याचे व त्यास पुरवठा झाल्याचे स्पष्ट होत आहे. यावरुन आरोपी यांच्या टिना-३ या बार्जमधील जप्त करण्यात आलेला डिझेलचा साठा हा त्यांनी जाणीवपुर्वक, गैरमार्गाने व बेकायदेशीरित्या मिळविला असल्याचे दिसून येत आहे. सदर जप्त डिझेलची वाहतूक व साठवणूक करण्याकरीता सदर टीना-३ या बार्जचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. तथापी, सुनावणीच्या दरम्यान टिना-३ या बार्जचे मालक यांनी त्यांचे सदरची बार्ज मागिल ३

महिन्यापासुन बंद असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे कामगारांचे पगार देणे बाकी असून जवळपास ३० ते ३५ लाखाची थकबाकी झाली असल्याने ते कर्जबाजारी झालेले आहेत. त्यामुळे सहानुभुतीपुर्वक विचार करुन सदरची बोट त्यांना अटी व शर्तींची पुर्तता करुन घेवून परत करावे, ही बाब विचारात घेता, शासनाचे परिपत्रक क्र. जीवका-१००५/प्र.क्र.४३८/ना.पु.२३, दि. ३० ऑगष्ट, २००५ मधील निर्देशानुसार सदरची जप्त करण्यात आलेली टिना-३ ही बार्ज तीच्या सद्याच्या बाजार दराप्रमाणे येणाऱ्या एकुण किंमतीपैकी ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर बार्जचे मालकास परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३३/२०११, दि.२०/०८/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u> :-**

१) जप्त करण्यात आलेली "टिना-३" ही बार्ज तिच्या सद्याच्या बाजार दराप्रमाणे येणाऱ्या एकुण किंमतीपैकी ५० टक्के एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर तिच्या मालकास परत करण्यात यावी.

२) सदरची बँक हमी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी बार्ज मालकाची राहील.

३) या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत सदरहू बार्ज विक्री करता येणार नाही व कोणासही हस्तांतरण करता येणार नाही.

४) तथापी, या बार्जच्या मालकाने अशी बँक हमी सादर न केल्यास सदर बार्जची पोलिसांनी नियमानुसार जाहिर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरची बार्ज लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण एकूण ५०,००० लिटर डिझेलचा साठा शासनजमा करण्यात येत असून, सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार इंडियन ऑईल कॉर्पोरेशन या तेल कंपनीस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

0014 वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) वासुदेव कुसाजी धुरी (बार्जचा चालक)
२) रंगीला प्रसाद शंभू राय (सेंकड मास्टर)
३) सुशांत किशोरी मन्ना (मास्टर)
४) टॅंकर बार्ज टिना नं. ३ चे तसेच शायनी शिपींग कॉर्पोरेशन प्रा.लि.चे मालक, स्टॅनी उर्फ स्टॅनली लिओ नऱ्होना

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) टर्मिनल मॅनेजर, मे. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि., शिवडी १ टर्मीनल, शिवडी रेल्वे स्टेशन समोर, शिवडी(पूर्व), मुंबई -१५ यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
३) चिफ मरीन मॅनेजर, पश्चिम विभाग, २५४-सी, डॉ. ॲनी बेसेंट रोड, वरळी कॉलनी, मुंबई-३० यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
४) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.